# प्रेसनोट

जा.क्र. ४४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१२/०६/२०१७.

## " भंडारा जिल्हा पोलीस योगा व प्राणायम शिबीर"

**भंडारा** :– आज दिनांक १२/०६/२०१७ मा. पोलीस अधिक्षक विनीता साहु,यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्याचे कुंटुबियांचे आरोग्य सुरळीत रहावे या दृष्टीकोनातुन पोलीस मुख्यालय भंडारा येथील चैतन्य ग्रांऊड येथे आंतराष्ट्रीय योगा दिनानिमीत्त योगा दररोज सकाळी ०५.३० ते ०७.३० वा. पर्यत नि:शुल्क योगा शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

योगा दिनानिमीत्त योगा जिल्हयातील पोलीस कर्मचा–यांचे तसेच पोलीस कुंटुबिय यांच्या दैनंदिन जीवनमान अतिशय ताणतणाव व धकाधकीचे असुन काही कर्मचा–यांना आपल्या कुटुंबीयांपासुन अलिप्त रहावे लागत असल्याने त्यांच्यात नैराश्य वाढत जाते. सदर बाब गंभीर असुन कर्मचा–यांचे ताणतणाव कसे घालवता येईल व सकारात्मक दृष्टया जीवन आनंदाने कसे जगता येईल, या उद्देशाने व आंतरराष्ट्रीय दिनानिमीत्ताने दि. १२ जुन ते २१ जुन पर्यंत योग सप्ताह शिबीर राबविण्यात येणार असुन आंतराष्ट्रीय योगा दिना निमीत्ताने घेण्यात आलेल्या योगा व प्राणायम शिबीरात रश्मि नांदेडकर अप्पर पोलीस अधिक्षक, पोलीस उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संजय जोगदंड, पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा सुनील कुलकर्णी, सपोनी. हत्तीमारे, पोलीस निरीक्षक श्री. गजानन कंकाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश इंगोले, पोलीस निरीक्षक सुरेश कुमार धुसर, पोलीस निरीक्षक बी. आर. गाडे पोलीस मुख्यालय येथील पोउपनी. मधुकर प्रधान, योग शिक्षीका श्रीमती. प्रियांशु राजेश पाण्डेय पोस्टे व शाखेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहुन पोलीस कर्मचा–यांना योगा व प्राणायमाचे धडे दिले जात आहे. हे लक्षात घेवुन त्यांच्यात मानसिक व शारीरिक बदल घडवुन सकारात्मक भावना व जीवन जगण्याची कला अवगत व्हावी म्हणुन योग प्राणायम शिबीर राबविण्यात येत आहे.

सदरचे शिबीर हे सर्वसामान्या करीता उपलब्ध आहे. करीता स्थानिक नागरीकांनी त्याचा जास्तीत जास्त संख्येने ~~लाभ~~ भाग घेवुन ~~भाग~~ लाभ घ्यावा.

पोनी. एम. एम. सिडाम
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र ८६९८७३९१९६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.